**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**
Online ISSN 2278-8808, SJIF 2026 = 8.727
https://www.srjis.com/issues_data/290
Peer Reviewed & Refereed Journal, MAR-APRIL 2026, Vol- 14/94

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 संदर्भात अध्यापक महाविद्यालयातील. विद्यार्थी-शिक्षकांची अभिवृत्ती : एक तुलनात्मक अध्ययन

ज्ञानराज प्रल्हाद पाटील
सहाय्यक प्राध्यापक, श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अध्यापक महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड,महाराष्ट्र
Email Id: dnyan10edu@gmail.com

**Paper Received On**: 20 MAR 2026

**Peer Reviewed On:** 24 APRIL 2026

**Published On:** 01 MAY 2026

***Abstract***

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण *2020 (NEP-2020)* हे भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये व्यापक बदल घडवून आणणारे धोरण मानले जाते. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश अंबाजोगाई शहरातील *B.Ed.* द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी-शिक्षकांची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण *2020* विषयीची अभिवृत्ती अभ्यासणे व पुरुष आणि महिला विद्यार्थी-शिक्षकांच्या अभिवृत्तीची तुलना करणे हा आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला. संशोधनासाठी शैक्षणिक वर्ष *2025-26* मधील *110* विद्यार्थी-शिक्षकांची निवड करण्यात आली. त्यामध्ये *42* पुरुष व *68* महिला विद्यार्थी-शिक्षकांचा समावेश होता. माहिती संकलनासाठी संशोधकाने तयार केलेली अभिवृत्ती मापनश्रेणी वापरण्यात आली. संकलित माहितीचे विश्लेषण मध्यमान, प्रमाण विचलन व *'t'* चाचणीच्या साहाय्याने करण्यात आले. निष्कर्षानुसार विद्यार्थी-शिक्षकांची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण *2020* विषयी अभिवृत्ती सकारात्मक असल्याचे दिसून आले. तसेच पुरुष व महिला विद्यार्थी-शिक्षकांच्या अभिवृत्तीमध्ये सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण फरक आढळून आला नाही.

***Key word***: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण *2020*, अभिवृत्ती, *B.Ed.* विद्यार्थी-शिक्षक, तुलनात्मक अध्ययन, शिक्षक शिक्षण

## प्रस्तावना

शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाचे मूलभूत साधन मानले जाते. आधुनिक काळात ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती ही शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे. बदलत्या जागतिकीकरण, तंत्रज्ञानातील प्रगती आणि कौशल्याधारित अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर शिक्षण व्यवस्थेत सातत्याने सुधारणा करणे अत्यावश्यक झाले आहे. भारतासारख्या विकसनशील देशात शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून ते मानवी संसाधन विकास, सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मता यांचे प्रभावी माध्यम आहे.

या पार्श्वभूमीवर भारत सरकारने 29 जुलै 2020 रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (National Education Policy 2020) जाहीर केले. सुमारे तीन दशकांनंतर आलेले हे नवीन शैक्षणिक धोरण भारतीय शिक्षण व्यवस्थेतील एक ऐतिहासिक व संरचनात्मक बदल मानले जाते. या धोरणामध्ये पूर्वप्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरांवर व्यापक सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. विशेषतः 5+3+3+4 शालेय संरचना, बहुविषयक शिक्षण (Multidisciplinary Education), कौशल्याधारित शिक्षण (Skill-based Education), अनुभवाधारित अध्ययन (Experiential Learning), तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल शिक्षण, संशोधनाभिमुखता आणि मातृभाषेतून शिक्षण या बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे.

*Copyright © 2026, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे शिक्षक शिक्षणामध्ये करण्यात आलेल्या सुधारणा. शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू असून कोणतेही शैक्षणिक धोरण प्रत्यक्षात यशस्वी होण्यासाठी शिक्षकांची भूमिका निर्णायक असते. त्यामुळे शिक्षकांची व्यावसायिक तयारी, त्यांच्या अध्यापन कौशल्यांचा विकास आणि धोरणाविषयीची सकारात्मक अभिवृत्ती अत्यंत महत्त्वाची ठरते. या दृष्टीने शिक्षक शिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या B.Ed. विद्यार्थी-शिक्षकांची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण ठरते, कारण हेच विद्यार्थी भविष्यातील शालेय शिक्षण व्यवस्थेचे आधारस्तंभ असणार आहेत.

B.Ed. विद्यार्थी-शिक्षक हे केवळ प्रशिक्षणार्थी नसून ते भविष्यातील शिक्षक, मार्गदर्शक आणि शिक्षणातील बदलांचे अंमलबजावणी करणारे घटक आहेत. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 विषयी त्यांच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यांच्या अभिवृत्तीवरून ते नवीन शैक्षणिक सुधारणा स्वीकारण्यास कितपत तयार आहेत, अध्यापनातील नवकल्पनांना कसा प्रतिसाद देतात आणि धोरणाच्या अंमलबजावणीत त्यांची भूमिका कशी असेल, हे स्पष्ट होते.

आजच्या डिजिटल युगात शिक्षण क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडत आहेत. ऑनलाइन शिक्षण, स्मार्ट क्लासरूम, कृत्रिम बुद्धिमत्ता, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम आणि मिश्र शिक्षण (Blended Learning) यांचा वापर वाढत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 या सर्व आधुनिक शैक्षणिक प्रवाहांना प्रोत्साहन देते. त्यामुळे विद्यार्थी-शिक्षकांची या बदलांकडे पाहण्याची दृष्टी, त्यांची स्वीकारण्याची तयारी आणि त्यांची अभिवृत्ती समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

विद्यमान संशोधन साहित्यामध्ये शिक्षक व विद्यार्थी-शिक्षकांच्या NEP-2020 विषयीच्या अभिवृत्तीचा अभ्यास विविध स्तरांवर करण्यात आला आहे. तथापि, प्रादेशिक स्तरावर विशेषतः अंबाजोगाई शहरातील B.Ed. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी-शिक्षकांच्या अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहे. तसेच पुरुष व महिला विद्यार्थी-शिक्षकांच्या अभिवृत्तीतील फरकाचा सखोल अभ्यासही पुरेशा प्रमाणात झालेला नाही. ही संशोधनात्मक उणीव लक्षात घेऊन प्रस्तुत अध्ययन हाती घेण्यात आले आहे.

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश B.Ed. विद्यार्थी-शिक्षकांची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 विषयीची अभिवृत्ती अभ्यासणे आणि लिंगाच्या आधारे (पुरुष व महिला) त्यांच्या अभिवृत्तीची तुलना करणे हा आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष शिक्षक शिक्षण संस्था, धोरणकर्ते आणि शैक्षणिक संशोधक यांच्यासाठी उपयुक्त ठरतील अशी अपेक्षा आहे, कारण त्यातून भविष्यातील शिक्षकांची तयारी आणि धोरण अंमलबजावणीची दिशा स्पष्ट होण्यास मदत होईल.

## संशोधनाची गरज व महत्त्व

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे शिक्षण क्षेत्रात अनेक बदल सुचवते. या बदलांची अंमलबजावणी प्रत्यक्ष वर्गखोल्यांमध्ये शिक्षकांमार्फतच होणार आहे. त्यामुळे शिक्षक प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी-शिक्षकांची अभिवृत्ती जाणून घेणे आवश्यक ठरते.

**प्रस्तुत संशोधनामुळे:**

1. NEP-2020 विषयी विद्यार्थी-शिक्षकांचे विचार समजण्यास मदत होईल.
2. शिक्षक शिक्षण संस्थांना प्रशिक्षण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविता येतील.
3. भावी शिक्षकांची तयारी कितपत आहे याचा अंदाज येईल.
4. धोरणाच्या अंमलबजावणीतील संभाव्य अडचणी ओळखता येतील.

## संदर्भ साहित्याचा आढावा

काले आणि देशमुख (2021)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 संदर्भात शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या जागरूकतेचा अभ्यास केला. बहुसंख्य प्रशिक्षणार्थी धोरणातील बदलांविषयी सकारात्मक असल्याचे आढळले.

eitei & Devi (2025) यांनी B.Ed. विद्यार्थी-शिक्षकांमध्ये NEP अंतर्गत ITEP विषयी सकारात्मक अभिवृत्ती आढळल्याचे नमूद केले आहे.

Kadian & Rose (2025) यांनी उच्च शिक्षण शिक्षकांमध्ये NEP अंमलबजावणीविषयी सकारात्मक दृष्टिकोन आढळल्याचे स्पष्ट केले आहे.

Sharma & Akalamkam (2021) यांच्या अभ्यासात NEP-2020 विषयी शिक्षकांचे दृष्टिकोन मिश्र स्वरूपाचे असल्याचे दिसून आले.

Gorai & Angadi (2023) यांनी शिक्षक अभिवृत्ती मापनासाठी मानकीकृत साधन विकसित केले.

**.साहित्याच्या आढाव्याचा निष्कर्ष**

उपलब्ध संशोधनांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 विषयी सकारात्मक अभिवृत्ती आढळून येते. तथापि, अंबाजोगाई शहरातील B.Ed. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी-शिक्षकांवर विशेष अध्ययन आढळून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले.

**संशोधन समस्या**

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 संदर्भात B.Ed. विद्यार्थी-शिक्षकांची अभिवृत्ती : एक तुलनात्मक अध्ययन"

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. B.Ed. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी-शिक्षकांची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 विषयीची अभिवृत्ती अभ्यासणे.
2. पुरुष व महिला विद्यार्थी-शिक्षकांच्या अभिवृत्तीची तुलना करणे.

**संशोधन गृहीतके**

$H_{01}$: B.Ed. विद्यार्थी-शिक्षकांची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 विषयीची अभिवृत्ती सकारात्मक नाही.

$H_{02}$: पुरुष व महिला विद्यार्थी-शिक्षकांच्या अभिवृत्तीमध्ये सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण फरक नाही.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धती (Descriptive Survey Method) वापरण्यात आली.

**नमुना**

अंबाजोगाई शहरातील B.Ed. महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये शिक्षण घेत असलेल्या द्वितीय वर्षाच्या 110 विद्यार्थी-शिक्षकांची निवड करण्यात आली.

| गट | | संख्या |
|---|---|---|
| पुरुष | -- | 42 |
| महिला | -- | 68 |
| एकूण | -- | 110 |

**संशोधन साधन**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 संदर्भातील अभिवृत्ती मोजण्यासाठी संशोधकाने 30 विधानांची पाच-बिंदू अभिवृत्ती मापनश्रेणी तयार केली.

**माहितीचे विश्लेषण**

तक्ता क्र. **1**

विद्यार्थी-शिक्षकांची **NEP-2020** विषयी अभिवृत्ती

| **गट** | **N** | **मध्यमान** | **SD** |
|---|---|---|---|
| **विद्यार्थी-शिक्षक** | 110 | 121.84 | 11.72 |

**अर्थनिर्वचन** : विद्यार्थी-शिक्षकांचा मध्यमान गुण उच्च असल्यामुळे त्यांची अभिवृत्ती सकारात्मक असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. 2
पुरुष व महिला विद्यार्थी-शिक्षकांच्या अभिवृत्तीची तुलना

| **गट** | **N** | **मध्यमान** | **SD** | **t-मूल्य** |
|---|---|---|---|---|
| **पुरुष** | 42 | 120.17 | 12.10 | 1.18 |
| **महिला** | 68 | 122.87 | 11.31 | |

**सारणी मूल्य (0.05 पातळी) = 1.98**

**अर्थनिर्वचन** : प्राप्त t-मूल्य (1.18) हे सारणी मूल्यापेक्षा कमी असल्यामुळे शून्य गृहीतक स्वीकारण्यात येते.

**प्रमुख निष्कर्ष**

1. अंबाजोगाई शहरातील B.Ed. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी-शिक्षकांची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 विषयी अभिवृत्ती सकारात्मक आहे.
2. विद्यार्थी-शिक्षकांना बहुविषयक शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण व तंत्रज्ञानाचा वापर उपयुक्त वाटतो.
3. महिला विद्यार्थी-शिक्षकांची अभिवृत्ती पुरुष विद्यार्थी-शिक्षकांच्या तुलनेत किंचित अधिक सकारात्मक आहे.
4. पुरुष व महिला विद्यार्थी-शिक्षकांच्या अभिवृत्तीमध्ये सांख्यिकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण फरक आढळून आलेला नाही.
5. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 विषयी भावी शिक्षकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित झालेला आहे.

**शिफारसी**

1. शिक्षक शिक्षण संस्थांमध्ये NEP-2020 विषयक कार्यशाळा आयोजित कराव्यात.
2. विद्यार्थी-शिक्षकांना धोरणाच्या अंमलबजावणीविषयी प्रत्यक्ष प्रशिक्षण द्यावे.
3. शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमामध्ये NEP-2020 चा अधिक सखोल समावेश करावा.
4. तंत्रज्ञानाधारित अध्यापन कौशल्यांच्या विकासावर भर द्यावा.

**मर्यादा**

1. संशोधन अंबाजोगाई शहरापुरते मर्यादित आहे.
2. केवळ B.Ed. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी-शिक्षकांचा समावेश करण्यात आला आहे.
3. निष्कर्ष संशोधकाने तयार केलेल्या अभिवृत्ती मापनश्रेणीवर आधारित आहेत.

**14. संदर्भसूची**

*Government of India. (2020). National Education Policy 2020. Ministry of Education.*

*Best, J. W., & Kahn, J. V. (2019). Research in Education. Pearson.*

*Kothari, C. R. (2018). Research Methodology. New Age International.*

*Mangal, S. K. (2019). Statistics in Education. PHI Learning.*

*Meitei, K. S., & Devi, N. N. (2025). Attitude of B.Ed. student-teachers towards NEP 2020. IJFMR.*

*Kadian, R., & Rose, V. (2025). Teacher attitudes towards NEP implementation. Journal of Neonatal Surgery.*